# Personal Profile



**Dr. Sadhana V. Mohod**
Associate Professor
Music Department
Smt. Vatsalabai Naik Mahila Mahavidyalay,Pusad
Email id – mohad_sadhana@rediffmail.com

| Sr. No | Title of Research Paper | Year of Publication | National/ International | Page No. |
|---|---|---|---|---|
| 1 | Shastriya sangitachya Prachar Prasar Madhye Drukshravya Madhyamanche Yogdan | 2018 | National | 1-3 |
| 2 | Bhartiya shastriy Sangitat Dhrupad Gayaki ani Vaggeykar yance Yogdan | 2021 | National | 4-8 |
| 3 | Sahitya ani Sangit | 2021 | National | 9-12 |
| 4 | Sangit Kaleche Bhartiya Dnyan Paramparetil Yogdan | 2023 | National | 13-21 |
| 5 | स्वर गानप्रभा डॉ. प्रभा अत्रे यांचे संगीतातील योगदान | 2023 | National | 22-25 |
| | **Chapter in Books** | | | |
| 1 | Kabir ki Bhasha (Kahat Kabir,Dr.Madhurani Shukla,R.K.Publication) | 2022 | National | 26-30 |
| 2 | Tarana – Sadabahar Gayan Shaili (Anhad Lok,Dr.Madhurani Shukla,Vyanjana Art) | 2022 | National | 31-39 |
| | **Book Published** तराणा एक दुष्टीक्षेप | 2023 | National | 40-42 |

ून येते. रेडिओ आणि टेपरेकॉर्डर या
आज ही पध्दती करतांना दिसून येते.
लीही संगीतपध्दती शास्त्रोक्त ज्ञान किंवा
कसंगीत इंटरनेटच्या व मोबाईलच्या
ाप्त होत आहे. आणि ही पध्दती
मुध्दा फार सुविधाजनक आहे.

क युगात लोकसंगीताच्या दृक आणि
ा प्रचारामुळे असे चित्र दिसते.
नेक ग्रंथ निर्मिती वाद्य निर्मिती व
निर्मिती झाली आहे.
परेसोबत गायनाला नविन दिशा मिळाली

ाविद्यालये, विद्यालये यातून संगीत शिक्षण
हे.
ण्याचा स्तर व परंपरा वाढत चाललेली
रमिक्स संगीताच्या कारणामुळे पाश्चात्य
न प्रभाव दिसून येत आहे.
गीत कलेला मंच, लोकप्रियता व प्रचार
दिसून येत आहे.
विन संकल्पना समोर येत आहे.
ोकसंगीताच्या प्रसारामुळे शास्त्रीय संगीत
ारखे दिसून येत आहे.
सार माध्यम, स्पर्धा, आधुनिक तंत्रज्ञान
योग लोकसंगीताचा स्तर दिवसेंदिवस

वसंत – संगीत कार्यालय, हाथरस
०४१०१ (उ.प्र.) २२ आवृत्ती १९९८
डॉ. नारायण मंगरूळकर – संगीतशास्त्र
ाशन. प्रथम आवृत्ती ४ जुलै १९९२
हरिश्चंद्र श्रीवास्तव –संगीत निबंध संग्रह,
त सदन २००६
मोहना मार्डीकर – संगीत शास्त्र परिचय,
ान २००९
डॉ. चित्रा मोडक – दूसरी एक गान विद्या,
ान २००९

**08**

# शास्त्रीय संगीताच्या प्रचार व प्रसारासाठी दृक- श्राव्य माध्यमांचे योगदान

**प्रा.डॉ. साधना मोहोड**
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महा. पुसद

**प्रस्तावना :-**

आजचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे युग आहे. विज्ञानामुळे आपल्याला बरीच प्रगती करता आली. असे म्हणतात की, 'गरज ही शोधाची जननी आहे,' या गरजेतुनच नवनवीन गोष्टींचे शोध लागले. प्रत्येक क्षेत्रालाच या शोधामुळे फायदाच झाला आहे. संगीत क्षेत्र ही त्याला अपवाद नाही. शास्त्रीय संगीताच्या प्रसार व प्रचारासाठी दृक - श्राव्य माध्यमांचा सहभाग महत्वाचा राहीला आहे. या उपकरणांमुळे शास्त्रीय संगीतातील शास्त्र व क्रियात्मक दोन्ही बाजुंना समृध्द करता आले. ज्यामुळे संगीत शिक्षण व प्रदर्शन प्रभावित झाले, आणि संगीत कला घराण्यांच्या मर्यादित कक्षेतुन बाहेर निघुन सामान्यांपर्यंत पोहचण्यात यशस्वी ठरली.

**विषय प्रवेश :-**

भारतामध्ये ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर हिंदुस्थानी संगीताला राजाश्रय प्राप्त झाला होता. ज्या राज्यामध्ये संगीताला राजाश्रय प्राप्त झाला होता त्यात प्रामुख्याने बुन्देलखंड, बघेलखंडातील रामपुर, जयपुर, ग्वाल्हेर, विष्णुपुर इ. होते. उपरोक्त राज्यातील ज्या ज्या राजांनी आश्रय दिला होता ते स्वत: संगीत प्रेमी, संगीतज्ञ होते. राजाश्रय प्राप्त झालेली काही ठिकाणे घराण्यांच्या नावाने ओळखले जावू लागले. त्यात ग्वाल्हेर, रामपुर, विष्णुपर, लखनौ, जयपुर इ. मुख्य होते.

राजाश्रय प्राप्त होवूनही समाजामध्ये संगीतज्ञ व गायकांना मात्र मानाने स्थान मिळत नव्हते. स्त्रीयांना तर संगीत शिकण्यावर पूर्ण निर्बन्ध लावण्यात आले होते. काही घराणेदार कलावंत असे होते की, जे केवळ आपल्या नातेवाईकांनाच गाणे शिकवित. जनसामान्यांना त्यांच्याकडून गाणे शिकणे दुरापास्त होते. अशा काळामध्ये संगीताला मानाचे स्थान मिळण्यासाठी संगीताचा प्रसार व प्रचार करण्यासाठी ज्यांनी अथक प्रयत्न केले त्यात बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड, उ. मौलाबक्श, पं. विष्णु दिगंबर पलुस्कर, पं. विष्णु नारायण भातखंडे,



1

कृष्णराव पंडीत इ. ची नावे प्रामुख्याने घेता येतील. यांच्याच प्रेरणेतुन संगीत शिक्षण संस्था उदयास आल्या ज्या आजही संगीत शिक्षण देण्याचे कार्य चांगल्या पध्दतीने करीत आहे. उ. मौलाबक्श यांनी प्रथम स्वरलिपीचा शोध लावला. ज्या व्दारे संगीतातील अनेक रचनांना पुस्तक रूपाने बांधण्याचे कार्य करण्यात आले. त्यानंतर पं. विष्णु दिगंबर पलुस्कर व पं. विष्णु नारायण भातखंडे यांनी स्वरलिपी तयार केली ज्याव्दारे अनेक मौल्यवान बंदिशींना जतन करता आले. १९०२ मध्ये 'भारतीय विश्व विद्यालय अनुदान आयोगाची' स्थापना करण्यात आली. ज्यात सामान्य शिक्षणासोबतच संगीत शिक्षणालाही महत्व देण्यात आहे, व संगीताला एक वेकल्पीक विषय म्हणुन समाविष्ठ करण्यात आले.

संगीताचा प्रचार व प्रसारामध्ये महत्वपुर्ण योगदान दिले ते दृक्-श्राव्य उपकरणांनी पुर्वी मुद्रण लेखन प्रचलीत नव्हते. मुद्रण - लेखनाचा शोध लागल्यामुळे संगीत साहित्याचे जतन करता आले. संगीताच्या प्रसार व प्रचारासाठी दृक-श्राव्य माध्यमे उपयोगी ठरली त्यात ग्रामोफोन, रेकॉर्डर, आकाशवाणी, दुरदर्शन, रेडीओ, संगणक, इंटरनेट इ. आहेत.

**ग्रामोफोन :-**

१८७७ मध्ये थॉमस अल्वा एडिसन यांनी ध्वनी मुद्रणाचा शोध लावला १८८७ मध्ये अलेक्झांडर ग्राहम बेल यांनी फोनोग्राम मध्ये काही बदल केले.

१९०८ मध्ये कलकत्ता, सिआल्डा या ठिकाणी ध्वनि मुद्रिका छापण्याचा करखाना उघडण्यात आला आणि 'ग्रामोफोन कंपनी ऑफ इंडिया' चा उदय झाला.

१९२६-१९६० मध्ये विद्युत शक्तिव्दारा मुद्रण करणारा फोनो माईक्रोफोन निर्माण करण्यात आला. यामध्ये ध्वनिवर्धक छोटया स्टिरीओ च्या साहाय्याने ध्वनिमुद्रण करण्यात येत होते.

ग्रामोफोन सारख्या यंत्रामुळे संगीतातील अनेक कलाकारांचे ध्वनिमुद्रण आज सुध्दा उपलब्ध आहे. ज्यांच्या माध्यमातुन त्याकाळातील कलाकारांची गाऊन शैली, गायकी यांचे ज्ञान आज प्राप्त होते. गायन आणि वादनाला जतन करून ठेवण्याची अशक्य प्राय वाटणारी गोष्ट ध्वनिमुद्रण यंत्रणेमुळे सोपी झाली. वाटेल तेव्हा जतन केलेल्या गायन वादनाला ऐकणे, त्यांचा अभ्यास करणे. याव्दारे सोपे झाले. गायन-वादना सोबतच संगीत शास्त्राचा परिचय करून देणारी विविध कलाकारांची, साधकांची, ध्वनिफित आज बाजारामध्ये उपलब्ध होत आहे.

**ध्वनिक्षेपक यंत्रणा :-**

या यंत्रणेचा शोध लागल्यानंतर १८ व्या शतकामध्ये ब्रिटिश काळात ही यंत्रणा भारतात आली. त्या आधी केवळ १०० ते १५० रसीक प्रेक्षकच मैफिलीमध्ये गायन वादनाचा आनंद घेवू शकत होते. कलाकाराला देखील जोराने गावे लागे. परिणामी मंदियं पुरक स्वर संगीताचा आस्वाद घेणे सर्व रसिकांना कठिण होते. आज १० ते २० हजार किंवा त्यापेक्षा जास्तही रसिक प्रेक्षक गाण्याचा आनंद पुर्ण रूपाने घेवू शकतात. याचे सर्व श्रेय ध्वनिक्षेपक यंत्रणेला जाते. गायक, वादक, आणि संगीतकाराच्या कौशल्याचा आस्वादही रसिक घेवू शकतात आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आज कलाकाराला जोराने गाणे म्हणण्याची गरज उरली नाही. मींड, कणस्वर, स्पर्श स्वर इ. बारिक गमकांना देखील सहज अनुभव केल्या जावू लागले.

**रेडीओ :-**

सन १८८६ मध्ये हेनरिक हर्ट्झ यांनी पहिले रेडिओ ट्रांसमिशन केले. १८८७ मध्ये मार्कोनी यांनी दुर सिग्नल पाठविले व त्यात ते यशस्वी झाले. त्यामुळे मार्कोनी यांना रेडिओचे अविष्कारक मानल्या जाते. सन १९२२ मध्ये ब्रिटीश ब्रॉडकास्टींग कम्पनीने सर्वप्रथम वायरलेसचा प्रयोग केला. १९३६ मध्ये इन्डियन स्टेट ब्रॉडकास्टींग सेवा हे नाव बदलुन 'आकाशवाणी' असे नाव केल्या गेले. 'आकाशवाणी' हे नाव थोर कवि, साहित्यीक नोबेल पारितोषक विजेते गुरू रविंद्र नाथ टागोर यांची देन आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय संस्कृती, अभिजात संगीत कलेच्या संदर्भामध्ये देशभर जनजागृती करून, सुसंस्कृत भारताचे महत्व देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात पोहचविण्याचे महत्वपुर्ण कार्य आकाशवाणीव्दारे शक्य झाले. शास्त्रीय संगीत लोकांपर्यंत पोहचविण्याचे आकाशवाणी हे एक सशक्त माध्यम होते. कारण त्यावेळेस उच्चकोटीच्या शास्त्रीय संगीत गायक -वादकांच्या कार्यक्रमाचे थेट प्रेक्षपण व्हायचे. आकाशवाणीच्या माध्यमातुन शास्त्रीय, उपशास्त्रीय संगीत, सुगम संगीत, लोकसंगीत, सिनेसंगीत अशा विविध गाण्यांच्या कार्यक्रमाचा आनंद लोकांना घेता येतो. आकाशवाणीच्या मुंबई, कलकत्ता, मद्रास सारख्या प्रमुख केंद्रातुन भारतीय संगीताच्या उत्तर हिंदुस्थानी व दक्षिण हिंदुस्थानी अशा दोन्ही पध्दतीचे प्रक्षेपण केल्या जाते. 'विविध भरती' सारख्या व्यावसायीक आकाशवाणी वाहिण्यांचा 'सिनेसंगीत' हा आत्मा आहे. या वाहिनीव्दारे 'भूले बिसरे गीत', 'फौजी भाईयों के लिए', 'हॅलो फर्माइश' आणि शास्त्रीय संगीताची माहिती देणाऱ्या 'संगीत सरीता' सारख्या कार्यक्रमांचा एक रसिक वर्ग मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. शास्त्रीय संगीत कलाकारांना आकाशवाणी वर गायन -वादन सादर करण्यासाठी आकाशवाणी च्या श्रेणी पध्दतीतुन जाणे आवश्यक असते. सादरीकरणाच्या दर्जानुसार कलाकारांना ४ श्रेणीमध्ये विभाजीत केल्या जाते. आकाशवाणीचे महत्व आणि लोकप्रियता लक्षात घेता असे म्हणणे अनुचित ठरणार नाही की

...र व प्रसारामध्ये आकाशवाणी इतके योगदान दुसरे ...

**...क अकादमी :-**

... आणि ललित कला अकादमी सोबतच संगीत, ...च्या इतर कलांच्या संरक्षण आणि संवर्धनाच्या हेतु सन १९५३ ... नाटक अकादमीची स्थापना करण्यात आली. अकादमीच्या ... प्रतिभावान लोकांना प्रोत्साहन देण्याच्या हेतुने कलाकारांना ... केल्या जाते. संगीत नाटक अकादमीव्दारे विविध विषयांवर ... संगीत संमेलनांचे आयोजन करण्यात येते. भारत आणी ...मध्ये सांस्कृतिक देवाण-घेवाण करण्याच्या उद्देशाने ...व्दारे भारतीय कलाकारांच्या शिष्टमंडळाला विदेशात ... येते.

संगीत नाटक अकादमी ने भारतीय शास्त्रीय संगीत, ...रंगमंच, लोकनृत्य इ. कलांची पुरातन माहिती गोळा करून ...ची स्थापना केली आहे. अकादमीच्या ग्रंथालयात संगीत व ... कलांची पुस्तके, मासीके, डिस्क संग्रहात आहेत. हिंदुस्थानी ...शिक्षणाच्या प्रसाराचे कार्य करणाऱ्या संस्थांना आर्थिक सहायता ... महत्वपुर्ण कार्य देखील अकादमीव्दारे केले जाते. ...मीव्दारे ध्वनिमुद्रण देखील केल्या जाते. त्यांचा स्वत:चा स्टुडीओ ... केंद्रीय संगीत अकादमी व्यतिरिक्त आज प्रत्येक राज्याची आपली ... आहे. केंद्रिय संगीत अकादमीच्या शिफारशीवरून दरवर्षी ...व्दारे एक गायक व एक वादक यांना सन्मानित केल्या जाते.

**...दर्शन :-**

आकाशवाणी सोबतच शास्त्रीय संगीत आणि नृत्याच्या प्रचार ...सारामध्ये दुरदर्शन सक्रिय भूमिका निभावत आहे. दुरदर्शन वरून ...ताचा अखील भारतीय कार्यक्रम प्रसारीत करण्यात येतो. ...दर्शनमुळे शास्त्रीय संगीताची लोकप्रियता वाढण्यास मदत झाली ...हे. कारण लोकांना घरामध्ये बसुन कार्यक्रम ऐकता व बघता येतो. ...दर्शन व्दारे आयोजित 'वोल्गा से गंगा तक' या कार्यक्रमांतर्गत ...आंतरराष्ट्रीय कलाकारांसोबत भारतीय कलाकारांची जुगलबंदीचा ...कार्यक्रम घेण्यात येतो. या सर्व प्रयत्नामुळे आज समाजामध्ये संगीत ...कलाकारांना मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. आज दुरदर्शनच्या ...माध्यमातुन नृत्य, नाटक, शास्त्रीय संगीत, सुगम संगीताच्या कार्यक्रमांचे ...प्रक्षेपण केल्या जाते. समुहगीतांचे कार्यक्रम, संगीत शिक्षणासंबंधी ...कार्यक्रम दुरदर्शनव्दारे प्रसारित होतात त्यात चित्रहार, रंगोली सारखे ...कार्यक्रम, सारेगमप, वोईस ऑफ इंडिया सारखा गाण्याच्या स्पर्धाचे कार्यक्रम देखील आयोजित केल्या जातात. अनेक रिॲलिटी शो चे ...आयोजन दुरदर्शन वरून केल्या जाते त्यात, झलक दिखला जा, डान्स इंडिया डांस, सारेगामपा अशा अनेक कार्यक्रमामुळे संगीताचा प्रसार व प्रचार होत आहे.

**कॅसेट - सीडी :-**

शास्त्रीय संगीताच्या प्रचार व प्रसारामध्ये टेपरेकॉर्डर, कॅसेट्स, सीडी इ. चे चलन वाढले आहे. कॉम्पॅक्ट डिस्क च्या माध्यमातून संगीत कलेच्या प्रचारासोबतच संगीत सुरक्षीत ठेवण्यास देखील मदत होत आहे. संगीत शिक्षण देणाऱ्या संस्था तेथील गुरू हे प्रसार माध्यमाचे मुलभुत स्रोत असतात. त्यांचे विचार, अनुभव गानशैली CD, कॅसेट्स च्या माध्यमातुन सगळ्या ठिकाणी पोहचविल्या जावू शकतो.

**इंटरनेट :-**

भारतीय संगीतात इंटरनेटमुळे एक क्रांती निर्माण झाली आहे. मान्यवर कलाकारांचे चारित्र, त्यांचे कार्य, ध्वनिफीती, अशा अनेक गोष्टींचे भांडार संगणकामुळे आपल्याला माहित होते. 'क्लासीकल म्युझिक ऑफ इंडिया' या साईट वर आपणा अनेक कलाकारांना ऐकु शकतो. SPIC MACAY Society for the promotion of Indian classical Music and Culture amongst the Youth या नावाची संस्था भारत, युरोप, अमेरिकामध्ये शास्त्रीय संगीताच्या प्रसाराचे कार्य करित आहे. पूर्वी संगीताता गुरु मुखी विद्या मानल्या जायची. गुरुसमोर बसून गाणे शिकावे लागे. आज ऑनलाईन पध्दतीने गुरु व्दारे संगीत आत्मसात येते.

अशाप्रकारे विविध दृक-श्राव्य माध्यमाव्दारे संगीत क्षेत्रात मोठ्याप्रमाणावर क्रांती घडुन येताना दिसत आहे व शास्त्रीय संगीताची लोकप्रियता वाढण्यास मदत होत आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. भारतीय संगीत मे वैज्ञानिक उपकरणोंका प्रयोग - अनिता गौतम
२. टेलीविजन और संगीत - डॉ. अशोक कुमार 'यमन'
३. आकाशवाणी एवं हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत - डॉ सुचिस्मिता
४. साहित्य संगीत और मिडीया - आश्विनी कुमार

❑❑❑

(SJIF) Impact Factor-7.675

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

April-2021

SPECIAL ISSUE CCXCIII (293)

## Dhrupad : It's Various Aspects, Style and Development

## धृपद शैली : विविध आयाम तथा क्रमिक विकास



**Prof. Virag S. Gawande**

Chief Editor & Director

Aadhar Social

Research & Development

Training Institute Amravati

**Dr Sarita Sanjiv Ingale**

Editor

Head, Department of Music

Late Chhaganlal Muljibhai Kadhi kala Mahavidyalaya,

Achalpur Camp .444805

Dist.Amravati.

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar International Publication**

CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 293 (CCXCIII)
ISSN : 2278-9308
April, 2021

# भारतीय शास्त्रीय संगीतात धृपद गायक आणि वाग्गेयकार यांचे योगदान

प्रा.डॉ.साधना हरणे (मोहोड)
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय,पुसद
( मो.नं. ९७६४५०१११० )

**Abstract (सारांश)**

धृपद म्हणजे ध्रुवपद याचा अर्थ बघितल्यास ध्रुव म्हणजे अढळ,स्थीर,शास्वत होय. म्हणजेच जे अढळ आहे,स्थीर,शास्वत आहे ते धृपद होय. भारतीय संगीतातील सर्व प्रथम गायन शैली म्हणुन धृपदाची ओळख आहे. धृपदानंतर ख्याल,ठुमरी,टप्पा इ.गान प्रकारांची उत्पत्ती झाली. धृपद गायनाची सुरवात केंव्हा झाली हे सांगणे कठीण असले तरी ५०० वर्षापासून ही गायन परंपरा असल्याचे सांगण्यात येते. १५ व्या शतकात ग्वाल्हेर चे राजा मानसिंह तोमर यांच्या काळामध्ये धृपदाचे प्रचलन वाढले. प्राचीन काळात धृपद गाणाऱ्या गायकांना 'कलावंत' म्हणत असत. अकबर बादशहाच्या दरबारातील गायक हे धृपद गाणारेच होते. त्यामधील 'तानसेन' यांचा समावेश नवरत्न दरबारामध्ये होतो. स्वामी हरिदास, गोपाल नायक, नायक बैजू, तानसेन, चिंतामण मिश्र या गायकांनी अनेक धृपदाची निर्मीती केली होती.

ख्यालाच्या अपेक्षेत धृपद गायन अधिक विस्तृत असते. धृपदाचे स्थायी, अंतरा,संचारी, आभोग असे चार भाग असतात, तर काही धृपदाला केवळ स्थायी व अंतरा हे दोनच भाग असतात. त्यांना 'तुक' असे म्हटल्या जायचे. चार भाग असलेले धृपद 'चौतुक' व दोन भाग असलेल्या धृपदाला 'दोतुक' म्हटल्या जाई. धृपदाच्या रचना संस्कृत,हिन्दी,ब्रज,मालवी,उर्दू इ. भाषांमध्ये आढळून येतात आणि श्रृंगार,वीर,भक्ति व शांत रसाचा अंतर्भाव धृपदामध्ये दिसून येतो. साथी करिता पखावज हे वादय मुख्यत्वे करून उपयोजीतात तर चौताल, सुलताल, झंपा, तीव्रा, ब्रह्म,रुद्र इ. तालांचा उपयोग धृपद गायनासाठी केल्या जातो. धृपद गायनाच्या चार शैली प्रचलित होत्या त्यांना 'बाणी' असे म्हणतात. त्या बाणी म्हणजे १) खण्डहार बाणी २) नौहार बाणी ३) गोबरहार बाणी ४) डागुर बाणी.

धृपद हे गीत प्रकार विशेष करून आग्रा, ग्वाल्हेर, बैरी येथील भागामध्ये प्रचलित होते. या घराण्यातील गायक व वाग्गेयकार यांचे संगीत क्षेत्रामधील योगदान याचा उहापोह या विषयाच्या माध्यमातून करण्याचा हा प्रयत्न.

**विषय प्रवेश :–**

प्राचीन काळातील प्रबंध गीत प्रकार लुप्त झाल्यानंतर धृपद किंवा धृवपद हा गीत प्रकार अस्तीत्वात आला. धृपद गायन हे अतिशय धीर, गंभीर, भारदस्त व लयतालयुक्त असे असायचे. काही ग्रंथकारांनी धृपदाच्या केलेल्या परिभाषा
खालील प्रमाणे .→

पं. भावभट्ट यांनी 'अनुपसंगीत रत्नाकर' या ग्रंथात धृपदाची व्याख्या खालील प्रमाणे दिली आहे.

गीर्वाणमध्य देशीयभाषा साहित्यराजितम् ।
द्विचतुर्वाक्यसंपन्नं नरनारीकथाश्रयम् ।
श्रृंगाररसभावाढ्यं रागालापपदात्मकम् ।
पदांतानुप्रासयुक्तं पदांतयुगकं च वा ।

प्रतिपादं यत्र बध्दमेवं पादचतुष्टयम् ।
उद्ग्राहध्रुवकाभोगांतरं ध्रुवपदं स्मृतम् ।

अबुल फजल यांनी 'आईने अकबरी' या आपल्या ग्रंथामध्ये धृपदाची व्याख्या करतांना असे म्हटले की, 'धृपद तीन या चार पंक्तीयो से निर्मीत पद है । उन पंक्तीयो की लंबाई कुछ भी हो सकती है । इन धृपदो का विषय प्रधान तथा उन व्यक्तियो की प्रशंसा होती है जो अपने पौरुष अथवा गुणो के कारण प्रसिध्द है ।

ज्या धृपदांममध्ये कृष्ण स्तुती असायची त्यांना अबुल फजल यांनी धृपद न म्हणता 'विष्णुपद' म्हटले आहे. त्यांच्या दृष्टीने धृपद गाणारे 'कलावंत' व विष्णुपद गाणारे हे 'किर्तनकार' होते.

पं. विष्णु नारायण भातखंडे यांनी ध्रुपदाचे स्थायी, अंतरा, संचारी, आभोग असे चार भाग सांगीतले आहेत. ध्रुपदामध्ये वीर, श्रृंगार तसेच शांत रसाचा अंतर्भाव सांगीतला आहे. तसेच ध्रुपद गायन हे मर्दाना व जोरकस असल्याचे पं. भातखंडे यांनी सांगीतले आहे.

'नाटयशास्त्र' या ग्रंथानुसार 'वर्ण,अलंकार,गान किया,यति,वाणी,लय' आदी जहा संबंध रहे, उन गीतों को 'ध्रुव' कहा गया है । जिन पदो में यह नियम शामील हो, उन्हे 'ध्रुवपद' या 'ध्रुपद' कहा जाता है ।

ध्रुपद गायकी –ध्रुपदाच्या गायनासाठी जोरदार, चांगला दमसास व गंभीर आवाज आवश्यक असतो. ध्रुपदामध्ये आलाप–ताना घेतल्या जात नाही. केवळ गमक,मींड, आणि कणस्वरांचा प्रयोग केल्या जातो. ध्रुपद गाण्यापूर्वी त्या रागातील विस्तार करतांना आलापामध्ये ता,न,न,री,द अशा प्रकारच्या वर्णांचा प्रयोग करतात त्यांना ' नोम् तोम्' किंवा 'जोड' म्हणतात. काही विद्वानांच्या मते प्राचीन काळी ध्रुपद गायनात आलाप करतांना 'ओम अनंत नारायण हरि' किंवा 'तूं ही अनंत हरि' या प्रकारे नामस्मरण करून केल्या जायचे. स्थायी,अंतरा,संचारी,आभोग या चारही भागातील आलापी करीत गती वाढविली जाते. द्रुत लयीत आलाप केल्यानंतर गीत गाईले जाते.

ध्रुपद गायकीला प्राधान्य देणारे घराणे व गायक–

ग्वाल्हेरचा राजा मानसिंग तोमर ह्याने धुपद गायन प्रचलित केले. अकबर बादशहाच्या दरबारातील सुप्रसिध्द गायक तानसेन ध्रुपद गायन करीत असे. स्वामी हरिदास,नायक गोपाल,नायक बैजू,मिया तानसेन,चिंतामणी ह्यांची ध्रुपदे आजही गायीली जातात. तानसेनाचे वंशज वजीर खाँ,मुहम्मद अली खाँ हे ही ध्रुपदेच गात असत.

स्वामी हरिदास ध्रुपद–धमार गात असत तसेच ते वाग्गेयकार देखील होते. त्यांच्या अष्टछाप शिष्यांमध्ये ना.बैजू, नायक गोपाल, मदनलाल, सोमनाथ, तानसेन, सौरसेन, दिवाकर पंडीत तसेच रामदास यांचा समावेश होता. स्वामीजींनी अनेक गेय पदाच्या रचना केल्या. संगीत सम्राट तानसेन हे ध्रुपदे गात.

ग्वाल्हेर घराणे ध्रुपद गायकीला प्राधान्य देणारे घराणे होते. धृपद अंगाचे ख्याल गाण्याची परंपरा या घराण्यात आहे. ग्वाल्हेर घराण्यातील अनेक गायक ध्रुपद गात असत व ख्याल देखील गात. पं.बाळकृष्णबुआ इचलकरंजीकर यांनी हस्सु–हद्दु खाँ यांच्याकडून ध्रुपद,धमार,टप्पा,ख्याल ह्यांची तालीम घेतली. शास्त्रीय संगीतातील ग्वाल्हेर घराण्याचा प्रवाह महाराष्ट्रात आणण्याचे फार मोठे कार्य बाळकृष्णबुआंनी केले. ग्वाल्हेर घराण्यातीलच वामनबुवा देशपांडे, राजाभैया पुछवाले या विद्वान गायकांनी अनेक ध्रुपदे गायीलीत. पं. राजाभैया पुछवाले यांनी 'ध्रुपद–धमार गायन' या पुस्तकात वामनबुआ देशपांडे यांची अनेक ध्रुपद धमार लिपीबध्द केले आहे.



CamScanner

आग्रा घराण्यात देखील ध्रुपद गाणारे अनेक विद्वान गायक आहेत. त्यामध्ये उ.फैय्याजखाँ साहेब यांना पितृवंश व मातृवंशाकडून ध्रुपद–धमारची तालीम मिळाली होती. खाँ साहेब मुळचे ख्यालीये पण नोम्–तोम् आलापी व ध्रुपद–धमार गाण्याकडे त्यांचा कल होता. खाँ साहेब ध्रुपद–धमारा शिवाय ठुमरी,टप्पा,गजल, कव्वाली हे सर्व गीतप्रकार कौशल्याने गात शिवाय त्यांनी 'प्रेमपिया' या टोपण नावाने अनेक बंदिशींच्या रचना केल्या.

२० व्या शतकात ध्रुपद गायनाचा पुनरुध्दार करण्याचा व लोकप्रिय करण्याचा प्रयत्न डागर बंधूंनी केला. उ.नसीर मोइनुद्दीन व उ.नासीर अमीनुद्दीन हे दोन्ही भाऊ केवळ ध्रुपद–धमारच गात असत तर इतर गीतप्रकार गात नसत.

ध्रुपद गायकीला लोकप्रिय करणाऱ्या आणखी विद्वान गायक बंधुंचे नाव म्हणजे रमाकांत गुंदेचा व उमाकांत गुंदेचा हे होय. ध्रुपद गायन शैलीतील डागुर बानीचे वारसदार आहेत. गुंदेचा बंधुनी केवळ ध्रुपद प्रकार आत्मसात करून त्याचे सादरीकरण केले नाही तर ध्रुपद शैलीची सेवा करून त्याचा प्रचार,प्रसारही केला. त्यांनी भोपाळ येथे 'ध्रुपद संस्थानाची' स्थापना केली. या दोघांनी कबीर,तुलसीदास या संतांच्या रचना ध्रुपद अंगाने सादर केल्या, याच परंपरेतील 'ऋत्विक सान्याल' जी, 'उदय भवाळकर', 'निर्माल्य डे' या विद्वान गायकांनी ध्रुपदाच्या माध्यमातून शास्त्रीय संगीताची सेवा केली आहे व आजही करीत आहे. बिहार राज्यातील 'दरभंगा घराणे', 'बक्सार' घराणे, 'बेट्टीआ घराणे' हे खंडार बानी व गोबरहार बानी शैलीच्या व्दारे ध्रुपदाचा प्रचार व प्रसार करीत आहे.

ध्रुपदाव्दारे, धमार,ख्याल या गीत प्रकाराव्दारे शास्त्रीय संगीतामध्ये भरीव योगदान देणारे आणखी एक तेजस्वी नाम म्हणजे वल्लभ संप्रदाय,ध्रुपद आणि हवेली पद गायन परंपरेतील महान उपासक, यशस्वी कलाकार संगीत विश्व मार्तण्ड 'आचार्य डॉ.पं.गोस्वामी गोकुलोत्सवजी महाराज' आचार्य गोकुलोत्सव जी महाराज हे उच्च कोटीचे संगीततज्ञ, वाग्गेयकार,ध्रुपद आणि ख्याल गायक असण्यासोबतच उत्कृष्ट पखावज आणि वीणा वादकही आहेत. आचार्य पं. गोकुलोत्सव जी महाराज हे व्याकरण,साहित्य,सांख्य,वेद–वेदान्त,साम गान,प्रबंध गान यात विद्वान आहेत सोबतच वेद,उपनिषद,श्रीमद्भगवतद्गीता यावर संस्कृतमध्ये भाष्य केले आहे. जवळपास ५००० हून अधिक रचना 'मधुरपिया' या उपनावाने ब्रज,फारसी,संस्कृत,उर्दू भाषेमध्ये रचल्या आहेत. तराणा गायकीतील नोम्,तोम्,तन,देरेना या सारख्या अक्षरांचा शोध घेऊन ते सामवेदातील स्तोभाक्षर, शुष्काक्षर यातील बीज मंत्र आहेत हे सप्रमाण सिध्द केले आहे. त्यांनी अनेक ध्रुपदे लिहीलीत्याशिवाय संस्कृत भाषेमध्ये तराण्यांच्या रचना देखील केल्या. महाराज जी वल्लभ संप्रदाय, पुष्टीमार्गीय पद–किर्तन परंपरा (हवेली संगीत) गायनात देखील दक्ष आहात.

उपसंहार–

प्राचीन काळी प्रबंध गायन प्रचलित होते. त्या नंतर ध्रुपद गायन आले. अमीर खुशरो यांनी 'ख्याल' या नव्या शैलीला जन्म दिला. सदारंग–अदारंग यांनी ख्यालगायन लोकप्रिय करण्याचे कार्य केले. या ओघात ध्रुपद–धमार शैली थोडी मागे पडली. वास्तविक सर्व गायन शैली ह्या ध्रुपद–धमार या शैलीतूनच उगम पावल्या आहेत. वर्तमान स्थीतीमध्ये ख्यालाच्या तुलनेत ध्रुपदाचे प्रचलन कमी होत आहे हे जरी खरे असले तरी वर्तमान नविन पिढीतील गायक ध्रुपद गीत प्रकाराचा वारसा,परंपरा पुढे सुरू ठेवतील यात दुमत नाही.

संदर्भ :

१ हि.क्र.सं.पु.मा.भाग–४ : पं.विष्णु नारायण भातखंडे

२ भारतीय संगीत की परम्परा वंशानुक्रम एवं वातावरण : डॉ.हरीकिशन गोस्वामी



CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | ध्रुपद–धमार गायन | : | राजाभैय्या पूछवाले |
| ४ | संगीत शास्त्र परिचय | : | मोहना मार्डीकर |
| ५ | शास्त्रीय संगीत के बहुआयामी स्तंभ संगीत विश्वमार्तंड आचार्य (डॉ.) पं.गोकुलोत्सव जी महाराज जीवन,कृतित्व एंव संगीत रचनाएं | : | डॉ.नीता माथुर |

Link –

1 http://bharatdiscovery.org
2 http://mr.m.wikipedia.org
3 http://m.marathi.thewire.in
4 http://vishwakosh.marathi.gov.in
5 http://en.m.wikipedia.org



CamScanner

# साहित्य व संगीत

प्रा.डॉ.साधना हरणे (मोहोड)
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिलामहाविद्यालय, पुसद जि.यवतमाळ
मो.नं. 7564501110 ,

सारांश :-

संगीत व साहित्य यांचा सहसंबंध प्राचीन काळापासून दिसून येतो. संगीत व साहित्याची आराध्य देवता म्हणून आपण जिच्याकडे बघतो ती सरस्वती देवी एकाच वेळी विणा व पुस्तक धारण केलेल्या स्वरूपात दिसते. प्राचीन काळी मंत्रांचे पठण, ऋचा गायन केल्या जायचे ते मधुर स्वरांच्या माध्यमातूनच. चार वेदांमधील पहिला वेद म्हणून ज्याला मान्यता आहे त्या ऋग्वेदामध्ये उदात्त, अनुदात्त व स्वरीत स्वरांचे स्थान असणे हेच संगीत साहित्याच्या सहसंबंधाची पुष्टी देतात. संगीत व साहित्य दोन्ही कला आहे. दोन्हीचा विकास समानांतर झाला. प्राचीन काळी ६४ कला सांगितल्या आहेत. त्यापैकी ५ ललितकला आहेत ज्यामध्ये 1) वास्तुकला 2) शिल्पकला 3) चित्रकला 4) काव्य कला 5) संगीतकला या कला येतात. या पाचही ललित कलांमध्ये संगीतकला सर्वश्रेष्ठ मानली जाते.

विषय प्रवेश :-

'गीतं, वाद्यं च नृत्यं' अशी संगीताची व्याख्या केली जाते. म्हणजेच गायन, वादन व नृत्य या तीनही कलांचा समावेश संगीतामध्ये येतो. तर साहित्याची व्याख्या 'शब्दार्थों सहितौ काव्यम्' शब्द आणि अर्थासहित असलेले ते काव्य. जे शब्द गायिल्या जातील त्याचा अर्थ जर सोपा असेल व शब्दोच्चारण्यासाठी जर सोपे असतील तर ते काव्य व सुरांसोबत अर्थासहित रसिक प्रेक्षकांपर्यत पोहोचेल. संगीताची व्याख्या बघितली तर गायन, वादन व नृत्य या तिन्ही मिळून संगीत बनते. यातील वाद्यसंगीतात साहित्य नाही. नृत्यामध्ये केवळ साथीकरिता साहित्याचा उपयोग होतो. केवळ कंठसंगीतामध्येच साहित्याचा उपयोग महत्त्वाचा ठरतो. मानवी जीवन व्यवहार विषयक चित्रण, विवरण, अर्थनिर्णयन, भाष्य अशा स्वरूपाच्या भाषिक अभिव्यक्तीला स्थूलमानाने 'साहित्य' असे संबोधले जाते. साहित्य व वाङ्मय ह्या संज्ञा जरी समानार्थी वापरला जात असल्यातरी त्याचा अर्थ व उपाययोजना भेद करावा असे समीक्षकांचे मत आहे. श्री अशोक केळकर यांच्या मते ललित वाङ्मयालाच साहित्य असे म्हणतात.

भारतीय संगीताचे शास्त्रीय संगीत व सुगम संगीत हे दोन भाग पडतात. शास्त्रीय संगीतामध्ये ख्याल, धृपद, धमार या उपशास्त्रीय संगीतामध्ये ठुमरी, चैती, दादरा, कजरी असे गीतप्रकार येतात तर सुगम संगीतामध्ये भावगीत, भक्तिगीत, अभंग, गझल असे गीत प्रकार येतात. वेदांमधील ऋचा गायनापासून सुरू झालेले संगीत प्रादेशिक भाषांमधील साहित्यामध्ये देखील गायिल्या जाऊ लागले.

ज्येष्ठ संगीत समीक्षक, गायक श्री.वा. ह. देशपांडे यांनी 'घरंदाज गायकी' या पुस्तकांमधून भारतीय अभिजात संगीताचे घटक म्हणून तीन घटकांचा उल्लेख केला आहे. त्यामध्ये स्वर व लय हे दोन घटक व तिसरा म्हणून 'उच्चारणाची अभिव्यक्ती' म्हणजे संगीतातील शब्द होय. हे शब्द म्हणजे रागाची 'चीज' किंवा 'बंदिश' होय असे सांगितले आहे. तद्वतच ठुमरी, भावगीत, सिनेमासंगीत या शब्दप्रधान संगीतामध्येही स्वर, लय व शब्द या तीन घटकांची आवश्यकता सांगितली आहे.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 328 (CCCXXVIII)
ISSN : 2278-9308
November, 2021

शास्त्रीय संगीतामध्ये अनेक संगीत विद्वान, वाग्गेयकार होऊन गेले ज्यांच्या रचना प्रसिध्द आहेत. आज या रिसर्च पेपरच्या निमित्ताने संगीतातील काही विद्वान वाग्गेयकार, रचनाकार, त्यांच्या बंदिशी, संत साहित्य, तसेच संगीत सुगम संगीतातील साहित्य व संगीत यांचा थोडक्यात ऊहापोह करण्याचा प्रयत्न केला आहे.

आपल्या महाराष्ट्राला उच्चकोटीचे संत परंपरा लाभली आहे संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, संत रामदास या संतांनी रचलेल्या गेय रचना आज अजरामर ठरल्या आहे. संत ज्ञानेश्वरांचे मोगरा फुलला, रुणुझुणु रुणुझुणु रे भ्रमरा, अनेक विराण्या, धनु वाजे घुणघुणा, विश्वाच्या कल्याणासाठी मागितलेले 'पसायदान हे काव्य म्हणून जितक्या ताकदीने ठरले त्याच ताकदीने भारतरत्न लता मंगेशकर यांच्या गायकीने त्यांचे सोने झाले. तुकारामाचे अभंग, जनाबाईचे अभंग ही संत साहित्यातील अभंगवाणी लता मंगेशकर, आशा भोसले, पंडित भीमसेन जोशी यांच्या आवाजाच्या सामर्थ्यामुळे जनमनावर राज्य करु लागली. संत सुरदास, संत तुळसिदास, संत मीराबाई, कबिराचे दोहे यांच्या काव्यरचना संगीत कला व ईश्वर प्राप्तीचे साधन म्हणून उच्च शिखरावर पोहोचल्या. साहित्य संगीताचा विचार करताना कवी जयदेव यांचे 'गीत गोविंद' हे काव्य विसरता येणार नाही. शारंगदेव, अमीर खुसरो, गोपाल नायक, स्वामी हरिदास असे अनेक वाग्गेयकार होऊन गेले ज्यांच्या रचना, काव्य, संगीतासाठी महत्त्वाच्या ठरल्या. मराठीतील प्रमुख कवी गीतकार ग. दि. माडगूळकर यांनी लिहिलेल्या 'गीत रामायण' मुळे त्यांना आधुनिक वाल्मीकी म्हणून ओळखल्या गेले तर प्रख्यात गायक सुधीर फडके यांनी 'गीत रामायण' गाऊन ते अजरामर केले.

शास्त्रीय संगीतातील बंदिशीमध्ये विविध प्रकारचे विषय बघायला मिळतात. त्यामध्ये निसर्ग वर्णन, ऋतूवर्णन, विरह वर्णन, सासू-सुनेची तक्रार, प्रियकराच्या मिलनाची आस असलेली विरहिनी असे अनेक विषय बंदिशीमधील साहित्यात दिसून येते. शास्त्रीय संगीतामध्ये स्वर, लयीच्या माध्यमातून शब्दाच्या व्दारे भावाभिव्यक्ति साकार केली जाते. सुगमसंगीता मध्ये शब्द हेच भाव प्रकट करण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. खाली काही बंदिशीच्या माध्यमातून वेगवेगळे विषय मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

सकाळच्या वेळी गायिल्या जाणाऱ्या रागांमधून व त्यांच्या बंदिशीमधून भक्तीरसाची निर्मिती होते. उदा. भैरव रागातील भातखंडे यांच्या पुस्तकातील खालील बंदिश.

1) स्थायी

धन धन मूरत कृष्णमुरारी , सुलच्छन गिरीधारी
छवी सुंदर लागे अती प्यारी ।

अंतरा

बंसीधर मनमोहन सुहावे, बलीबली जाऊ मोरे मन भावे
सबरंग ग्यान विचारी ॥

किंवा

डॉ.प्रभा अत्रे यांच्या स्वरांगिनी पुस्तकातील भैरव रागाची बंदिश

2) स्थायी

हे आदिदेव शिवशंकर, भोर भयी जागो करुणाकर
दे हो दरस किरीपा कर ।

अंतरा

भोली सुरत नैन समाऊ, मन मे प्रेम की ज्योत जलाऊ
मुख मे नाम जपाऊ ॥

वरील बंदिशीमधून भक्तिभाव दिसून येतो. काही बंदिशी शृंगारीक असल्याचे दिसुन येते.

1) उदा.यमन रागातील बंदिश

1) स्थायी

ऐरी हेरी आली पिया बीन, सखी कल ना परत मोहे

घडी पल छिन दिन ।

अंतरा

जबसे पिया परदेस गवन कीनो

रतियाँ कटत मोहे तारे गिन गिन ॥

किंवा

2) मारुबिहाग रागामधील डॉ.प्रभा अत्रे यांनी बांधलेली बंदिश प्रियकराच्या मिलनासाठी आतुर असलेली अभिसारिका यातून आपल्याला भेटते

स्थायी

जागूं मैं सारी रैन बलमा, रसिया मन लागे ना मोरा ।

अंतरा

बहुत रमायो सौतन घरवा, पिया आ गरवा लगा ॥

• मल्हार रागांच्या अनेक बंदिशीमधून आपल्याला ऋतुवर्णन बघायला मिळते.

1) उदा. स्थायी

बादर वा बरसन को आये, नन्ही नन्ही बूँदन

गरज गरज अब, चहूँ और ते बिजूरी चमकत ।

किंवा

2) बोले रे पपिहरा, पपिहरा, अब घन गरजे

अंतरा उन उन कर आई बदरियाँ, बरसन लागी सदारंगीले

मनरसा, दामिनी सी कौंद चौंद मोरा जियरा लरजे ॥

• काही बंदिशीतून विरह भाव व्यक्त होतो.

उदा. मारवा रागातील बंदिश

स्थायी

सुन सुन बतियाँ, सगरी रतियाँ

उचट जिया मोरा डर पावे ।

अंतरा

रहत अकेलो थर थर कौंपे, जियरा उनबिन

लरजत मोरा, कासे कहूँ सगरो दुःख पावे ॥

उपशास्त्रीय संगीतातील ठुमरी गीत प्रकारांमध्ये शब्दाला महत्त्व दिल्या जाते. शब्दांच्या माध्यमातून भावाभिव्यक्ति केल्या जाते. उदा. 'याद पिया की आये' किंवा 'बाबुल मोरा नैहर छुटो ही जाये' यासारख्या बंदिशी थेट हृदयाला जाऊन भिडतात.

सुगम संगीतातील भावगीत, गझल, भक्तिसंगीत यात तर शब्दांचे प्राबल्य आढळते. रचनाकारांची गीते, त्यांना देण्यात आलेल्या सुंदर सुरावटी व त्या गाण्याच्या रूपाने सादर करणारी प्रभावान गायक मंडळींनी, त्या गीतांना घराघरात पोहोचवले आहे. त्या गीतांमधून व्यक्त होणारे भाव सामान्य रसिकांना आपलेसे वाटतात.

शब्द प्राबल्य असलेला दुसरा गीतप्रकार म्हणजे भक्तिसंगित भक्तिसंगिताची परंपरा महाराष्ट्रमध्ये प्रामुख्याने दिसून येते. भक्तीसंगीतामध्ये अभंग, गौळण, भारुड ही गीते येतात. संत एकनाथांनी भारुडे या लोकसाहित्याला शिखरावर आरूढ करण्याचे काम केले. त्यांनी वासुदेव, भराडी, गोंधळी, भुत्या, पोतराज, जोशी, दरवेशी, माळी, मांग, जोगी यासारख्या लोकभूमिकांचे माध्यम वापरले. त्याचबरोबर महालक्ष्मी, अंबा, कान्होबा यासारख्या दैवी भूमिका लेखनात हाताळल्या. नाथांनी भारुडातून 'सदाचार व नीती' यावर भर देऊन परमार्थ साधला.

संगीत व साहित्य यांचा सर्वात जास्त सहसंबंध असलेला गीतप्रकार म्हणजे गझल होय. गझल हा वृत्तांचा, काव्याचा व गायनाचा प्रकार आहे. अमृतराय हे मराठीतील पहिले गझल कवी. माधव ज्युलियन यांनी बऱ्याच मराठी गझला लिहिल्या. मराठीमध्ये गझल प्रचलित करण्याचे सारे श्रेय कविवर्य सुरेश भट यांना जाते. उषःकाल होता होता काळरात्र झाली। अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली ॥ असे लिहिणारे कवी सुरेश भट 'केव्हा तरी पहाटे, उलटून रात्र गेली' अशी तलम मुलायम गझल लिहीतात व आशाताईंच्या आवाजाने ती गझल अधिक मुलायम होते. 'तरुण आहे रात्र अजुनी, राजसा निजलास का रे, किंवा सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या अशा कितीतरी मराठी गझलांना लतादीदी व आशाताईच्या स्वरसाजामुळे नवा आयाम मिळाला व हिंदी गझलांप्रमाणे मराठी गझलही प्रसिद्ध झाली. हिन्दी गझलांचे अनेक शायर होऊन गेले त्यामध्ये कैफी आजमी, गुलजार, निदा फाजली, मजरूह सुलतानपुरी, मिर्झा गालिब, शकील बदायुनी असे कितीतरी शायर सांगता येतील ज्यांच्या गझलाना संगीताचे कोंदण लाभले व लता मंगेशकर, आशा भोसले, मोहम्मद रफी, जगजीत सिंग यांच्या सारख्या गायकांनी त्या शायरीला चार चाँद लावले.

निष्कर्ष :-

वरील सर्व गोष्टी विचारात घेता हाच निष्कर्ष निघतो ज्याप्रमाणे संगीताचे शास्त्र आणि कला या एकाच नाण्याच्या बाजू आहेत. त्या प्रमाणे 'साहित्य व संगीत' ह्या देखील एकाच नाण्याच्या बाजू आहेत. किंवा 'साहित्य व संगीत' या बहिणी-बहिणी आहे. त्या एकमेकींच्या हातात हात घालूनच यशस्वी वाटचाल करीत आहे व करणार आहेत.

संदर्भ :-

1) संगीत विशारद : डॉक्टर लक्ष्मीनारायण गर्ग.
2) भारतीय संगीत : स्वरूप व प्रयोजन - कृष्णकांत दाते
3) बंदिशीतील सौंदर्यविचार – डॉ.शुभांगी गहुलीकर.
4) संगीत निबंध संग्रह : हरिश्चंद्र श्रीवास्तव.
5) हि.सं.च. क्रमिक पुस्तक मालिका - भाग 2,3,4.
6) स्वरांगिनी - डॉ. प्रभा अत्रे
7) मराठी संस्कृती कोष-खंड 19.
8) भारतीय संस्कृती कोष – खंड 6

Link

1) https://infohub122.blogspo)
2) https://musicatyricsworld.com
3) https://literature.awgp.org
4) https://www.rekha.org
5) https://mr.m.wikipedia.org

cial Issue : 1.2
January 2023
Vol. : IX

Interdisciplinary Peer Reviewed Journal For Innovative Research And Evaluation

# Loknayak

ISSN (L) 2278 - 4284



dian Knowledge
ystem : Concept,
pe and Criticism

CamScanner

Interdisciplinary Peer Reviewed Journal For Innovative Research And Evaluation

# Loknayak

ISSN (L) 2278 - 4284

Special Issue : 1.2

January 2023

Vol. : IX

CamScanner

Copyright © By Loknayak Bapuji Aney Mahila Mahavidyalaya, Yavatmal

No part of this publication may be reproduced or distributed in any form or by any means, electronic, mechanical, photocopy, recording, or otherwise or stored in a database or retrieval system without the prior written permission of publishers. This edition can be exported from India only by the Publishers.

Interdisciplinary Peer Reviewed
Journal For Innovative Research
And Evaluation

# Loknayak

ISSN (L) 2278 - 4284

Volume : IX

Special Issue : 1.2 January 2023

Published by : Loknayak Bapuji Aney Mahila Mahavidyalaya, Yavatmal

Visit us : http://www.aneymahila.com

Contact us : loknayak@aneymahila.com
loknayakpublication@gmail.com
M-9911771811

CamScanner

# संगीत कलेचे भारतीय ज्ञान परंपरेतील योगदान

प्रा.डॉ.साधना हरणे (मोहोड)
संगीत विभाग प्रमुख
श्रीमती वत्सलाबाई नाईक म.महाविदयालय पुसद
ता. पुसद जि. यवतमाळ
मो. नं – 9764501110
Email :- mohod_sadhana@rediffmail.com

सारांश –:

भारतीय संगीत हे पुरातन काळापासून आजतगायत चिरंतन व चिरकाळ आपले स्थान टिकवून आहे. 64 कलांमधून व ललीत कलांमध्ये संगीत ही कला सर्वश्रेष्ठ मानली जाते. संगीतामध्ये कुठल्याही भाषेचे, धर्माचे, रंगाचे, देशाचे, वयाचे बंधन नाही. करण संगीत ही आत्म्याची भाषा आहे. आत्म्याशी संवाद साधण्याकरीता संगीता इतके सहज माध्यम दुसरे कुठलेही नाही. मानवी जीवनात संगीताला महत्वूपर्ण स्थान आहे. सध्याच्या धकाधकीच्या अयुष्यात मानसीक स्वास्थ्य मिळण्यासाठी संगीताचा मोठया प्रमाणात उपयोग होतो. संगीताची उत्पत्ती ही वेदकाळापासून मानली जाते. वेदांचे निर्माता ब्रम्हदेव यांनी ही कला शंकराला दिली व शंकराव्दारे ही देवी सरस्वतीला मिळाली. सरस्वती देवीला संगीत कलेचे ज्ञान नारदा व्दारे प्राप्त झाले तसेच नारदाने स्वर्गातील गंधर्व, किन्नर आणि अप्सरा यांना देखील संगीताचे ज्ञान दिले. त्यांनतर ही कला पृथ्वीवर अवतरली असे काही विदवानाचे मत आहे. थोडक्यात भारतीय संगीत परंपरा ही फार प्राचीन आहे.

## प्रस्तावना :-

संगीत कलेचे भारतीय ज्ञान परंपरेतील योगदान या विषयाला स्पर्श करण्यापूर्वी भारतीय ज्ञान परंपरा म्हणजे काय हे बघणे उचीत ठरेल. भारतीय ज्ञान परंपरा ही अव्दितीय ज्ञानाचे प्रतिक आहे. ज्यामध्ये ज्ञान-विज्ञान, लौकिक-पारलौकीक, कर्म-धर्म यांचा समन्वय दिसून येतो. वेदांनी विदयेला मानवातील श्रेष्ठतेचा आधार म्हणून स्विकारले. भारतामध्ये प्राचीन काळी गुरूकुलांमार्फत शिक्षण देण्यात येत असे नंतर विश्वविदयालयांची स्थापना झाली. प्राचीन काळातील शिक्षण, ज्ञान, परंपरा, मानवाला प्रोत्साहीत करायची. प्राचीन काळातील तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, उज्जायीनी, काशी ही विदयापीठे शिक्षणाचे प्रमुख केंद्रे मानली होती. वैदिक काळात स्त्रिया ही शिक्षण क्षेत्रात अग्रेसर होत्या. त्यात गार्गी, मैत्रेयी, ऋतंभरा, लोपामुद्रा, वल्लभी ही प्रमुख नावे घेता येतील त्याचप्रमाणे बोधायन, कात्यायन, चरक, आर्यभट्ट, अगस्त्य, शंकराचार्य, स्वामी विवेकानंद सारख्या महापुरूषांनी आपल्या बुध्दीने संपूर्ण विश्वामध्ये ही ज्ञानपरंपरा जोपासली आहे.



CamScanner
16

विषय प्रवेश :-

संगीत ही कला सर्व ललीत कलांमध्ये सर्वश्रेष्ठ मानली जाते. भारतीय परंपरेनुसार संगीताचा संबंध वेदांपासुन दिसून येतो. वेदाचा बिज मंत्र ओम हे तीन अक्षर ब्रम्हा, विष्णु, महेश, या ईश्वरीय शक्तिचे दयोतक आहे. प्राचीन चार वेद आहेत ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद यातील सामवेद हा संगीतमय वेद आहे. सामवेदातील गेय पद हे उदात्त, अनुदात्त, स्वरीत या तीन स्वरांनी गायील्या जायचे यामध्ये सात स्वरांचा अंतर्भाव केलेला दिसून येतो. उदात्त मध्ये गांधार-निषाद, अनुदात्तमध्ये रिषभ-धैवत, स्वरीतमध्ये षडज-माध्यम-पंचम हे सात स्वर वर्तमान संगीतात आजही गायील्या जातात.

संगीताचा संबंध देवी-देवता, ऋषी-मुनी यांच्याशी जोडण्यात येतो. जसे श्री. शंकराच्या हाती डमरु, सरस्वती देवी जवळ विणा, श्रीकृष्णाची बासरी, नारदाची तंबुरी, हनुमंताच्या चिपळया. संगीताचा उपयोग ऋषी-मुनी मोक्ष प्राप्तीसाठी करायचे. वैदिक काळामध्ये ब्राम्हण, क्षत्रिय, शुद्र हे तीन वर्ग होते. ब्राम्हण या तीन वर्गांना विदया आणि संगीताचे शिक्षण दयायचे. या काळामध्ये स्त्रिया गायन, वादन व नृत्य या तीनही कलांमध्ये सहभाग घ्यायच्या. वीणावादनात स्त्रिया निष्णात होत्या. नृत्याचा कार्यक्रम हा मोकळया मैदानात व्हायचा व त्यात स्त्री-पुरूष दोघेही संमिलीत व्हायचे. यज्ञ प्रसंगी नियुक्त गायक हे उत्कृष्ट गायक असण्यासोबत उत्कृष्ट वादक व प्रबंधकार सुध्दा असायचे. रामायण-महाभारत काळामध्येही संगीत कला प्रचारात असल्याचे दिसून येते. भेरी, दुन्दुभी, मृदंग, घट, विणा, डिंडिम इ. वादयांचा उल्लेख रामायनात आढळतो.

प्राचीन काळापासून संगीताचे दोन वर्ग किंवा प्रकार चालत आलेले दिसून येतात.

मार्गी संगीत 2) देशी

मार्गी संगीताचा उपयोग ऋषी मुनि मोक्ष प्राप्तीसाठी करायचे तर देशी संगीताचा उपयोग जनमन रंजन करणे हा दिसून येतो. भारतीय शास्त्रीय संगीत हे अभिजात संगीत मानले जाते. शास्त्रीय संगीताच्या उत्तर भारतीय संगीत पध्दती प्रवाहामध्ये आहे. उत्तरकडे अनेक आक्रमणे झालीत त्यामुळे उत्तर भारतीय संगीत पध्दतीमध्ये अनेक परिवर्तन घडून आल्याचे दिसून येते त्यामानाने कर्नाटक संगीत हे आपले मुळ स्वरूपातील अस्तित्व टिकवून आहे.

भारतीय ज्ञान परंपरेमध्ये संगीताचे योगदान

सामवेद : प्राचीन चार वेदांपैकी सामवेद हा संगीतमय वेद होता यामध्ये सामगान करतांना उदात्त, अनुदात्त स्वरीत स्वरांचा प्रयोग व्हायचा सामगान हे केवळ यंत्र यागादी पर्यंतच मर्यादित होते. सर्वसाधारण लोक किंवा गायक 'गांधर्वगानाचा' प्रयोग करायचे. संगीतातील विदवान किंवा प्रकांड पंडीत यांना 'गंधर्व' या उपाधीने गौरविल्या जायचे. त्यामुळेच सामवेदाचा उपवेद 'संगीतवेद' याला 'गांधर्ववेद' देखील म्हटल्या जायचे.



CamScanner
17

ब्राम्हण, आरण्याक व उपनिषदांमध्ये संगीत :- ऐतरेय ब्राम्हण यात स्वर युक्त वीणांच्या प्रकाराचा उल्लेख मिळतो. कौशीतकी, ब्राम्हण यात नृत्य, गीत व वादयांच्या समुहाला 'शिल्पी' हे नाव दिले आहे. जैमिनीय ब्राम्हण यात उदगात,कर्करी, अलाबु, वक्रा, आयघाटलिका व कच्छपी या वीणांच्या प्रकारांचा उल्लेख मिळतो. आरण्यक ग्रंथामध्ये सामवेदातील पदांऐवजी भिन्न पद व गदय व साहित्याचा उपयोग केलेला दिसतो व संगीतातील केवळ षडज, मध्यम व पंचम या स्वरांचाच प्रयोग व प्रसार झाल्याचे दिसते. प्रत्येक वेदांशी संबंधीत उपनिषदामध्ये वेदांच्या प्रकृतीनुसार संगीत विषयक वर्णन मिळते.

शिक्षा ग्रंथ :-

माण्डूकी शिक्षा, पाणिनीय शिक्षा, नारदीय शिक्षा या शिक्षा ग्रंथामध्ये संगीतातील षडज, रिषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत, निषाद या सात स्वरांचा उल्लेख मिळतो. मांडुकी शिक्षा या नुसार छांदोग्य व्यक्ती केवळ चार स्वरांचा प्रयोग करत तर सामगानात सात स्वरांचा प्रयोग होत होता. पाणिनी ग्रंथामध्ये उदात्त, अनुदात्त, स्वरीत या तीन स्वरांमध्ये सात स्वरांचा अंतर्भाव दिसून येतो.

उदात्ते निषाद गांधारावनुदात्त ऋषभ धैवतौ ।

स्वरीत प्रभवा होते षडज, मध्यम, पंचमा ॥

नारदीय शिक्षा मध्ये सात स्वर, 21 मुर्च्छना, 49 तानां, ग्राम, ग्राम राग, ताल इ. चा विस्तारपूर्वक उल्लेख मिळतो. नारदीय शिक्षेच्या सातव्या खण्डामध्ये सात स्वरांच्या अंतर्गत गात्र विणेवर स्थितीचे वर्णन केले आहे.

पौराणिक काल :-

पुराण काळामध्ये संगीत हे अधिक प्रगत अवस्थेत असल्याचे दिसते. मार्कण्डेय पुराण, कालिका पुराण, वायु पुराण, शिव पुराण, स्कंध पुराण, पदय पुराणामध्ये शैव परंपरा च्या अंतर्गत संगीतातील महत्वपूर्ण स्थानांचा उल्लेख येतो. रामायण,महाभारत कलामध्येही संगीताचा विकास झालेला दिसतो. रामायण हे संगीतमय काव्य आहे. तर वैदिक व पौराणिक काळाच्या तुलनेत महाभारत काळामध्ये संगीत अधिक प्रगत अवस्थेत होते.



CamScanner

नाट्यशास्त्र :

चौथ्या शतकामध्ये महर्षी भरत यांनी 'नाट्यशास्त्र' हा ग्रंथ लिहीला. भरताचा नाट्यशास्त्र हा ग्रंथ पहिला ग्रंथ मानला जातो. भारतीय संस्कृती, साहित्य व संगीताच्या दृष्टीने 'नाट्यशास्त्र' हा ग्रंथ महत्वपूर्ण मानला जातो. भरताने सात शुद्ध स्वरांसोबत अंतर गांधार व काकली निषाद हे स्वर, श्रुती स्थापने संदर्भात सारणा चतुष्टी हा सिध्दांत, षडज व मध्यम हे दोन ग्राम, 14 मुर्च्छना, 18 जाती, नउ रस, नायक-नायिका भेद, चित्रा, विपंची, मत्तकोकिला विणा इ. चा उहापोह संगीताध्यायात केलेला दिसतो. भरताच्या नाट्यशास्त्र ग्रंथातील 28 व्या अध्यायात वादय संबंधीचे विस्तृत वर्णन मिळते.

दत्तिलम-बृहदेशी :-

दात्तिल मुनी यांनी 'दलितम' हा ग्रंथ लिहीला. या ग्रंथामध्ये 7 स्वर, 2 ग्राम, 22 श्रुती, 18 जाती, अलंकार, वर्ण, गमक, ग्राम-मूर्च्छना इ. चे विवेचन केले आहे. मतंग, मुनींनी 'बृहद्देशी' हा ग्रंथ लिहीला. मतंग मुनींनी 'किन्नरी' विणेची निर्मिती केली. मतंग मुनीनी आपल्या ग्रंथात 'राग' या शब्दाचा सर्वप्रथम उल्लेख करून रागांचे विस्तृत वर्णन आपल्या ग्रंथात केले आहे. मतंग यांनी 7 शुद्ध स्वर, 11 जाती व जातींचे 10 लक्षणे सांगीतली आहेत.

संगीत रत्नाकर :-

प्राचीन काळातील ग्रंथापैकी महत्वाचा ग्रंथ म्हणून पं. शारंगदेव यांनी लिहीलेला 'संगीत रत्नाकर' हया ग्रंथाकडे बघीतले जाते. या ग्रंथात एकुण 7 अध्याय त्यात संगीतकलेच्या सातही बाजुंचे विस्तृत अध्ययन केले आहे. पहिल्या अध्यायात सात शुद्ध व बारा विकृत स्वरांचे, दुस-या अध्यायात ग्रामराग व उपराग, तिस-या अध्यायात वाग्येयकारांचे लक्षण, गीताचे गुण-दोष, गायकाचे गुण-दोष, गमक, आलप्ती,रागालप्ती इ. चे वर्णन चौथ्या अध्यायात प्रबंधाध्याय, पाचव्या अध्यायात तालांचे वर्णन, सहाव्या अध्यायात वादयांचे तत, सुषिर, घन, अवनध्द असा वादयांचे वर्गिकरण सातव्या अध्यायात नाट्य, नृत्य इ. वर प्रकाश टाकलेत आहे.

रागतरंगिनी :-

14 व्या शतकाच्या शेवटी महाकवि लोचन यांनी राग तरंगिनी हा महत्वपूर्ण ग्रंथ लिहीला. कवि लोचन यांनी 7 शुदध व 9 विकृत असे 16 स्वर मानले आहे. त्यांनी 22 श्रुतींमध्ये सात स्वरांची स्थापना करताना प्रत्येक स्वर अंतिम श्रुतीवर स्थापन केला.15 व्या शतकात पं. रामामात्य यांनी 'स्वरमेल कलानिधी' हा दक्षिणी संगीतावर आधारीत ग्रंथ लिहीला. या ग्रंथामध्ये प. रामामात्य यांनी सर्वप्रथम संगीताचे गांधर्व व गान असे विभाजन करून त्यांच्या व्याख्या सांगितल्या 15 व्या शताब्दीत पुंडलीक विठ्ठल यांनी सदराग



CamScanner

चंद्रोदय व रागमाला हे दोन ग्रंथ लिहीले सदराग चंद्रोदय या ग्रंथात 'मुखारी' किंवा 'कनकांगी' हे शुद्ध स्वर सप्तक मानले. त्यांनी 7 शुद्ध व 7 विकृत असे 14 स्वर मानले आहे. रागमाला या ग्रंथात राग-रागिणी पध्दतीच्या अंतर्गत 6 पुरूष राग प्रत्येकाच्या 5-5 रागिन्या व 5-5 पुत्र राग मानले. 16 व्या शतकात पं.सोमनाथ यांनी दक्षिणी संगीतावर आधारीत 'राग विबोध' हा ग्रंथ लिहीला. पं.सोमनाथ यांनी 22 श्रुतींवर सात स्वरांचे विभाजन प्राचीन पध्दतीने केले आहे. पं.रामामात्य व पं. शारंगदेव यांनी स्वरांना 'च्युत' हे संबोधन दिले तर पं.सोमनाथ यांनी 'मृदु' हा शब्द प्रयोग केला आहे.

संगीत पारिजात :-

17 व्या शतकात पं अहोबल यांनी 'संगीत पारिजात' हा ग्रंथ लिहीला. पं अहोबल यांनी 22 श्रुतींवर सात स्वरांची स्थापना करताना प्रत्येक श्रुतीवर स्वर सांगीतले त्यांनी स्वरांना तीव्र, तीव्रतर, तीव्रतम अतितीव्रतम अशी नावे दिली. अशा प्रकारे त्यांनी 7 शुद्ध व 15 विकृत अशा 22 स्वरांना 29 नावे दिलीत, त्यांनी 7 जातींचे वर्णन या ग्रंथात केले आहे. त्याशिवाय रागांच्या गानसमयाचे देखील वर्णन या ग्रंथात दिले आहे. 17 व्या शताब्दीतच हृदय नारायण देव यांनी 'हृदय कौतुक' व 'हृदय प्रकाश' ही दोन पुस्तके लिहीली. पं.अहोबल यांनी विणेच्या तारेवर स्वरांची स्थापना केली.

रागतत्व विबोध :

